सार्वजनिक पाणीपुरवठा, पथदिवे
ग्राहकांच्या थकीत वीज देयकांबाबत.

# महाराष्ट्र शासन

## उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

**शासन निर्णय क्रमांक : वीदेव-२०१८/प्र.क्र.१० /ऊर्जा-५**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १६ मे, २०१८.

पहा : महावितरण कंपनीचे पत्र क्र.पी-कॉम/लेखा/शासन थकबाकी/१४९ दिनांक ०२. ०१. २०१८.

**प्रस्तावना:**

राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हापरिषद, ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या सार्वजनिक पाणीपुरवठा योजना व पथदिवे यांना महावितरण कंपनीतर्फे विद्युत जोडण्या दिल्या असून सदर विद्युत जोडण्यांच्या, विद्युत देयकांच्या थकबाकीचा भरणा संबंधित कार्यालयांकडून नियमितपणे होणे क्रमप्राप्त आहे. परंतु संबंधित कार्यालयांनी विद्युत देयकांचा भरणा वेळेवर न केल्याने त्यांचेकडील सप्टेंबर, २०१७ अखेर एकूण थकबाकीची रक्कम रुपये ४५३८.४७ कोटी इतकी झाली आहे.

दि.२१.११.२०१७ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत ऊर्जा विभागाच्या प्रस्तावावर चर्चा करतांना सदर थकबाकीबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला होता.

"महानगरपालिका, नगरपालिका तसेच ग्रामपंचायत यांच्याकडे थकीत वीज बिलावरील दंड व व्याज सोडून मूळ थकबाकीच्या ५०% रक्कम १४ व्या वित्त आयोगाच्या निधीमधून उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव सादर करावा".

सदर निर्णयानुसार महावितरण कंपनीने उपरोक्त संदर्भीय दिनांक ०२.०१.२०१८ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने दिनांक ०८.०३.२०१८ रोजी झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत टिप्पणी सादर करण्यात आली होती. त्यावर झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतले आहेत.

**शासन निर्णय :-**

१. महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायतीकडील सार्वजनिक पाणीपुरवठा योजना व पथदिवे यावरील महावितरण कंपनीच्या ३१ मार्च, २०१८ पर्यंतच्या थकीत बिलाच्या रकमांपैकी (दंड व व्याज कमी करुन) ५०% रक्कम वित्त आयोगाच्या अनुदानातून नगर विकास विभागाने परस्पर महावितरण कंपनीकडे वळत्या कराव्यात व उर्वरित ५०% रक्कम संबंधित मनपा/नगरपालिका/ नगरपंचायतीकडून महावितरण कंपनीने वसूल करावी. आवश्यकता वाटल्यास महावितरण कंपनीने सदरची रक्कम भरण्यासाठी त्यांना सुलभ हप्ते करुन द्यावेत.

२. जिल्हा परिषद/ महाराष्ट्र जीवन प्राधिकरण /ग्रामपंचायत कडील पाणीपुरवठा वीज थकबाकीच्या ३१ मार्च, २०१८ पर्यंतच्या थकीत बिलाच्या रकमेपैकी (दंड व व्याज कमी करुन) ५०% रक्कम वित्त आयोगाच्या निधीमधून ग्रामविकास विभागाने महावितरण कंपनीस थेट अदा करावी. उर्वरित ५०% रक्कम संबंधित जिल्हा परिषद/ महाराष्ट्र जीवन प्राधिकरण /ग्रामपंचायत यांनी महावितरण कंपनीकडे भरावी. त्याकरिता आवश्यक वीजेच्या बिलाच्या रकमेचे सुलभ हप्ते योजना महावितरण कंपनीने करावी.

३. ग्रामपंचायतकडील पथदिव्यावरील वीज थकबाकीच्या दिनांक ३१ मार्च, २०१८ पर्यंतच्या रकमा (दंड व व्याज कमी करुन) ग्राम विकास विभागाने महावितरण कंपनीकडे जमा करावी, ग्राम विकास विभागाने याकरिता वित्त आयोगाच्या अनुदानाचा ५०% वापर करावा.

४. दि.३१.०३.२०१८ पूर्वी जे पथदिवे ग्रामपंचायत भागात आहेत त्या पथदिव्यांची पुढील वीज देयकाची रक्कम ग्रामविकास विभागाने महावितरण कंपनीकडे, शासन अनुदान किंवा वित्त्त आयोगाच्या अनुदानातून भरणा करावी. दि.३१.०३.२०१८ नंतरच्या आस्थापित झालेल्या पथदिव्यांच्या वीज देयकांची रक्कम संबंधित ग्रामपंचायतींकडून महावितरण कंपनीस अदा करण्यात यावी. नवीन पथदिव्याकरिता वेगळे मीटर लावण्यात यावेत.

५. ज्या ग्रामपंचायतीला वित्त आयोगाचा निधी वितरित झाला असेल, त्या ग्रामपंचायतींना नळ योजनांच्या थकीत वीज बिलांची रक्कम वित्त आयोगाच्या रक्कमेतून महावितरण कंपनीकडे भरण्यास परवानगी देण्यात येत आहे.

६. ज्या नगरपंचायत / नगरपरिषद /नगरपालिका/ महानगरपालिकेला वित्त आयोगाचा निधी वितरित झाला असेल, अशा नगरपंचायत/नगरपरिषद /नगरपालिका/ महानगरपालिकेला पथदिवे व नळ योजनांची बिले वित्त आयोगाच्या रक्कमेतून महावितरण कंपनीकडे भरण्यास परवानगी देण्यात येत आहे.

७. दि.३१.०३.२०१८ नंतरच्या ग्रामीण पाणीपुरवठा योजना / प्रादेशिक योजना यांच्या वीज देयकांची रक्कम संबधित ग्रामपंचायत / जिल्हा परिषद व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी महावितरणकडे नियमित भरावी. तसेच दि. ३१.०३.२०१८ नंतरच्या नगरपरिषद, नगरपंचायत व महानगरपालिका क्षेत्रातील पाणी पुरवठयांच्या वीज देयकांची रक्कम महावितरणकडे नियमितपणे भरण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित नगरपरिषद, नगरपंचायत व महानगरपालिका यांची राहील.

८. ग्रामपंचायतीच्या दिवाबत्ती व ग्रामीण पाणीपुरवठा योजनांची वीज देयके भागविण्याबाबत ग्रामविकास विभागाच्या शासन निर्णय VPM-२०८५/C.R.१९४०/२२, दि.३०.०१.१९९० मध्ये उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने उचित सुधारणा ग्राम विकास विभागाने तात्काळ करावी.

९. तसेच उपरोक्त निर्णयांच्या तात्काळ अंमलबजावणीसाठी नगरविकास विभाग, ग्रामविकास विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी आवश्यक सूचना त्यांच्या आधिपत्याखालील सर्व संबंधितांना देऊन कार्यपूर्ती अहवाल मागवावा तो ऊर्जा विभागाकडे पाठवावा.

१०. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांचा अनौपचारिक संदर्भ क्र. ९१/२०१८ दिनांक २१.०३.२०१८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

११. हा शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०५१६१६५६४४६८१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**( भि.य.मंता )**
**शासनाचे उप सचिव**

**प्रत:**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव

२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव

३) मा. मंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव

४) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद, विधानभवन, मुंबई.

५) मा. राज्यमंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव

६) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

७) अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

८) प्रधान सचिव (नगर विकास - २), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

९) प्रधान सचिव (ग्राम विकास विभाग), ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१०) प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.

११) सर्व मंत्रालयीन विभाग

१२) सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, वर्ल्ड ट्रेड सेंटर, सेंटर नं. १,१३वा मजला, कफ परेड, मुंबई ०५.

१३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१

१४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई / महाराष्ट्र-२, नागपूर

१५) महालेखापाल (लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई

१६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

१७) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई

१८) अवर सचिव ,(१४६१-कक्ष) नियोजन विभाग , नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

१९) अवर सचिव (ऊर्जा-३), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.

२०) कक्ष अधिकारी, (अर्थसंकल्प/व्यय-१६), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

२१) निवड नस्ती (ऊर्जा-५), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.

२२) ऊर्जा विभागातील सर्व कार्यासने.